Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ७, अंक ६ ] गुरुवार ते बुधवार, मार्च १८-२४, २०२१/फाल्गुन २७, शके १९४२-चैत्र ३, शके १९४३ [पृष्ठे ९, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १७.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो. पुसद (सु) कलम-१२७(२)-अधिसूचना-टिपीव्ही-६-१३०५.—

ज्याअर्थी, पुसद नगर परिषदेची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेले आहे) चे कलम ३१ (१) मधील तरतुदीनुसार शासनाच्या, नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्रमांक टिपीएस-२७९५-१२६७- प्र. क्र. १९८-९५-नवि-१३, दिनांक २६ मे १९९८ अन्वये भागशः मंजूर केली आहे व ती दिनांक २६ जुलै १९९८ पासून अंमलात आलेली आहे तसेच वगळलेल्या भागाची पुनर्प्रसिद्ध विकास योजना अधिसूचना क्रमांक टिपीएस-२७००-४५१२- प्र. क्र. ५३ अ-२००१-नवि-१३, दिनांक ६ ऑगस्ट २००१ अन्वये भागशः मंजूर केली आहे व ती दिनांक १ ऑक्टोबर २०११ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे "उक्त मंजूर सुधारित विकास योजना" असे उल्लेखिलेले आहे) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मौ. पुसद येथील स.क्र. ३३/१ या जागेवर आरक्षण क्रमांक २३, "बगीचा" व आरक्षण क्रमांक २४ "माध्यमिक शाळा" क्षेत्रफळ अंदाजे अनुक्रमे ९६००.०० चौ. मी. व ९०००.०० चौ. मी. (यापुढे "उक्त आरक्षण" असे उल्लेखिलेले आहे.) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून, सदर आरक्षणांसाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, पुसद आहे (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे उल्लेखिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील जागा उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून दहा वर्षाच्या कालावधीत संपादित केलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, संबंधित जमीन मालक श्रीमती दिपाली दिनेश जाधव (यापुढे "उक्त जमीन मालक" उल्लेखिलेले आहे.) यांनी स. क्र. ३३/१ पैकी त्यांचे ०.५२ हे. आर. जमिनीचे अनुषंगाने उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण क्रमांक २३, "बगीचा" व आरक्षण क्रमांक ३१ "शापिंग" (उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार "कन्व्हिनियंट शॉपिंग " असे आहे.) या आरक्षणांसाठी उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक २० ऑगष्ट २०१६ रोजी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) सूचना (यापुढे यांस "उक्त सूचना" असे उल्लेखिलेले आहे.) बजावलेली होती ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालक यांनी उक्त अधिनियमाचे कलम १२७ अन्वये उक्त सूचना बजाविल्यानंतरही उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त अधिनियामचे कलम १२७ मधील तरतुदींनुसार विहीत मुदतीत उक्त जागा संपादीत केली नाही अथवा उक्त आरक्षणाखालील जमीनीचे भूसंपादन करण्यासबंधाने कोणतेही पावले उचलली नाहीत ;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, पुसद यांनी पत्र क्र. ४०६/२०२०, दिनांक ३ जुलै २०२० अन्वये, उक्त सूचनेच्या अनुषंगाने नगर परिषद सर्व साधारण सभा ठराव क्र. ०९, दिनांक ७ सप्टेंबर २०१६ अन्वये नगर परिषदेने सादर प्रकरणामध्ये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येऊ नये असा निर्णय पारित केल्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे सदर पत्रात नमूद करून उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) अन्वये पुढील कार्यवाही करण्यासाठी विहित मार्गाने प्रस्ताव शासनास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नमूद ठराव क्र. ०९, दिनांक ७-०९-२०१६ नुसार निधीअभावि नगर परिषदेला सदर जागा विकत घेणे शक्य झाले नाही, असा ठराव बहुमताने पास झाला आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक, नगर रचना, यवतमाळ शाखा कार्यालयाने दिनांक ९ जुलै २०२० रोजी सादर केलेला अहवाल व त्यासोबत असलेल्या सदर जागेची मोजणी नकाशा (मो. र. क्रमांक ६३८, दिनांक ९-११-२०१०) नुसार उक्त जमीन मालक यांची जागा भागशः आरक्षण क्रमांक २३, "बगीचा" व भागशः आरक्षण क्रमांक २४ "माध्यमिक शाळा" या आरक्षणांनी बाधित होत असल्याचे निदर्शनास आलेवरून यानुषंगाने नेमके आरक्षण व क्षेत्र निश्चितीबाबत संचालनालयाने दि. १४ डिसेंबर २०२० रोजीच्या पत्रान्वये कळविलेनुसार सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा कार्यालयाने पूरक अहवाल दिनांक ११-०१-२०२१ रोजीचे पत्रान्वये सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त पूरक अहवालानुसार उक्त सूचनेमध्ये नमूद स. नं. ३३/१ मधील ०.५२ हे. आर. पैकी, ४१००.०० चौ.मी. क्षेत्र हे आरक्षण क्रमांक २३ "बगीचा" या आरक्षणाने बाधित होत असून ११००.००चौ. मी. क्षेत्र हे आरक्षण क्रमांक २४ "माध्यमिक शाळा" या आरक्षणांनी बाधित होत असून (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधिलेले आहे.)

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतीची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, उक्त जागेवरील, उक्त आरक्षण, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ (२) अन्वये व्यपगत झाल्याबाबतची अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १-१२-२०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने,उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) खालील अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उपकलम (२) अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे याद्वारे उक्त आरक्षणापैकी, उक्त जमिनीपुरते आरक्षण व्यपगत झाले असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या दिनांक २६-०५-१९९८ रोजीचे मंजूर अधिसूचनेमध्ये खालील परिशिष्टात दिल्याप्रमाणे सुधारणा करीत आहे ;

त्याकरिता उक्त मंजुर सुधारित विकास योजनेच्या दिनांक २६-५-१९९८ रोजीचे मंजुर अधिसूचनेच्या शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :—

**परिशिष्ट**

| अ. क्र. | मौजे, तालुका व जिल्हा | उक्त विकास योजनेतील आरक्षण व वि. यो. अहवालानुसार क्षेत्र | उक्त जागेचा तपशिल | आरक्षणातून भागशः व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) हे. आर |
| १ | मौजा पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ. | (१) आ. क्र. २३ "बगिचा" क्षेत्र अहवालानुसार ०.९६ हे. आर (नकाशानुसार ६२५०.०० चौ. मी.) | स. नं. ३३/१ | (१) आ. क्र. २३ चे ४१००.०० चौ. मी. क्षेत्र |
| २ | | (२) आ. क्र. २४ "माध्यमिक शाळा" क्षेत्र अहवालानुसार ०.९० हे. आर (नकाशानुसार ६४००.०० चौ. मी.) | | (२) आ. क्र. २४ चे ११००.०० चौ. मी. क्षेत्र |

**टिप :–** (१) वरील बदल दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा मुख्यधिकारी, पुसद नगर परिषद, पुसद, जिल्हा यवतमाळ यांच्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खुला ठेवण्यात येत आहे.

(२) सदर अधिसूचना संचालनालयाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सुधाकर नांगनुरे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ४ मार्च २०२१.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १८.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. D.T.P.-D.P. Pusad(R)-Sec-127(*2*)-Notification-TPV-VI-1305.—

Whereas, the Revised Development Plan of Pusad Municipal Council has been partly sanctioned under the provisions of Section 31 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* its Notification No. TPS-2795/1267-CR-198-95-UD-13, dt. 26 May 1998 & came into force with effect from dt. 26 July 1998 & republished Development Plan of Excluded Part has been sanctioned *vide* its Notification No. TPS-2700/4512-CR-53A-2001-UD-30, dt. 6 August 2001 & came into force with effect from dt. 1-10-2001(hereinafter referred to as the "said Sanctioned revised Development Plan");

And whereas, in the said Development Plan, the land bearing S. No. 33/1 of Pusad is reserved as Site No. 23 "Garden", & No. 24 "Secondary School" having an area approximately of 9600.00 sq. mt.& 9000.00 sq. mt respectively (hereinafter referred to as "the said Reservation") for which Appropriate Authority is Municipal Council, Pusad (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land under said reservation have not been acquired by the said Appropriate Authority within Ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas, the land owner Smt. Deepali Dinesh Jadhav (hereinafter referred to as "the said Land Owner") of the land bearing SurveyNo. 33/1 admeasuring an area 0.52 Ha. of village Pusad in respect of Site No. 23 "Garden", & Site No. 31 "Shopping" (It is "Convinient Shopping" as per the said sanctioned Revised Development Plan) has served a notice dt. 20 August 2016 under Section 127*(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority;

And whereas, even after the serving of the said Notice as aforesaid, the land is not acquired or no steps as required under Section 127 of the said Act has been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period from the date of service of the said notice under sub Section *(1)* of the Section 127 of the said Act, by the said Appropriate Authority;

And whereas, the Chief Officer, Municipal Council, Pusad has submitted proposal to the Government for further action to be taken under Section 127&(*2*) of the said Act *vide* their letter No. 406/2020, 03rd July 2020 mentioned therein that the Municipal Council has passed the Resolution No. 09, dt. 07th September 2016 of general Body of Municipal Council regarding not to undertake the land acquisition process in respect of the said notice due to which Municipal Council has not initiated any and land acquisition procedure;

And whereas, as per above mentioned Resolution No. 09, dated 07th September 2016; due to paucity of funds' the Municipal Council, Pusad could not purchase the same land.

And whereas, as per the report alongwith Measurement Plan (M.R.No.638, dt. 09th November 2010) of land under reference submitted by the Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal *vide* their letter dated 09th July 2020, it has came to notice that the land under notice is affected partly by Site No. 23- "Garden" and partly by Site No. 24 "Secondary School", & accordingly the Directorate of Town Planning has conveyed vide letter dated 14th December, 2020 to confirm the particular reservations & their areas, the Yavatmal Branch office has submitted their supplementary report *vide* their letter date 11th January 2021;

And whereas, as per above mentioned supplementary report of the Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal, out of land admeasuring 0.52 Hect. from S.No.33/1 (as mentioned in notice), 4100.00 Sq.mt. land is affected by Site No. 23 "Garden" and 1100.00 sq.mt. land is affected by Site No.24 "Secondary School" (hereinafter referred to as "the said Land");

And whereas, after considering the above facts in respect of the said reservations on the said land in the said Sanctioned Revised Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the Notification under Section 127*(2)* of the said Act, regarding the lapsing of the said reservations on the said land;

And whereas, the Government in Urban Development Department, *vide* Resolution No. TPS-1813/3211-CR-508-UD-13, dated 01-12-2016 has delegated the powers exercisable by it under Section 127*(2)* of the said Act to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, in respect of Development Plans of all Municipal Councils/ Nagar Panchayats/Zillha Parishad as a Planning Authority;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby notify the lapsing of the said reservations in respect of the said land under Section 127*(2)* of the said Act and for that purpose amends the Notification of the said Sanctioned Revised Development Plan, dated 26th May 1998 as specified in the Schedule herein below;

For this purpose, after the last entry in the Schedule of Modification accompanying the Notification of the said Sanctioned Revised Development Plan dated 26th May 1998 the following new entry shall be added.—

SCHEDULE

| Sr. No. | Mauja, Tal., Dist. | Reservation in the said Development Plan & its approximate area as per D.P. Repoet | Description of the Land | Part approximate Area lapsed from the said reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Mauja Pusad, Taluka-Pusad, Dist. - Yavatmal | (1) Site No.23 “Garden” Area As per report 0.96 Hect. (As per plan 6250 Sq.mt.) | S.No.33/1 | (1) Out of Site No.23, 4100.00 Sq.mt. |
| | | (2) Site No. 24 “Secondary School” As per report 0.90 Hect. (As per plan 6400 Sq.mt.) | | (2) Out of Site No.24, 1100.00 Sq.mt. |

*Note :* (1) A copy of the part plan showing the area which is lapsed from the said reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Pusad during office hours on all working days for inspection to public up to one month.

(2) This Notification shall also be published on the Directorate web site *www.dtp.maharashtra.gov.in.*

SUDHAKAR NANGNURE,
Director of Town Planning,
Maharshtra State, Pune.

Pune :
Dated the 4th March 2021.

अ.-एक-अ-२ (१७४८).

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिध्द झालेली आहे.**

५

**बुधवार, मार्च १०, २०२१/फाल्गुन १९, शके १९४२**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु) म. शा. रा., अ, क्र. १७.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचले** :-(१) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र. ७/का-७, दिनांक ३०-०३-२०१९.

(२) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र. १९/का-७, दिनांक १९-११-२०१९.

(३) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०१९/प्र.क्र. १९/का-७, दिनांक २०-१२-२०१९.

(४) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२१/जि.प.व.पं.स.निवड/कावि-२३३/२०१९, दिनांक २१-१२-२०१९.

(५) मा. राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र. ५/का-७, दिनांक ०५-०३-२०२१.

**आदेश**

क्रमांक कक्ष-२१-जि.प.व पं.स.निवड-कावि-३-२०२१.—

उपोद्घातातील अ.क्र. (१) अन्वये वाशिम जिल्हा परिषद व त्याअंतर्गत एकूण ०६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका २०२० करीता प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रम परिशिष्ट-१ नुसार घेण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमासोबतच्या परिशिष्ट-२ नुसार वाशिम जिल्हा परिषद व परिशिष्ट-३ नुसार त्याअंतर्गत एकूण ०६ पंचायत समितीकरिता अनुज्ञेय ठरत असलेल्या जागांचा मा. राज्य निवडणूक आयोगामार्फत निश्चित करून देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने, वाशिम जिल्हा परिषद व त्याअंतर्गत ०६ पंचायत समितींसाठी अंतिम प्रभाग रचना व आरक्षण सोडत घेण्यात येवून, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

उपोद्घातातील अ.क्र. (२) अन्वये वाशिम जिल्हा परिषद व त्याअंतर्गत एकूण ०६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका २०१९-२०२० करिता निवडणूक कार्यक्रमातील परिशिष्ट-१ नुसार दिनांक ०७ जानेवारी २०२० रोजी मतदान व दिनांक ०८ जानेवारी २०२० रोजी मतमोजणी झालेली आहे. सदर निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांची नावे निवडणूक कार्यक्रमातील परिशिष्ट-१ नुसार दिनांक १० जानेवारी २०२० रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

उपोद्घातातील अ.क्र. (३) अन्वये वाशिम जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका २०१९-२०२० बाबत उपोद्घातातील अ.क्र. (२) अन्वये घेण्यात येत असलेल्या नागरिकांच्या मागास प्रवर्गातील सदस्यांच्या निवडणुका ह्या मा. सर्वोच्च न्यायालयातील "विशेष अनुमती याचिका" क्र. ३३९०४-३३९१०/२०१७ मधील आदेशाच्या अधिन राहून घेण्यात येत आहेत. याबाबत उपोद्घातातील अ.क्र. (४) अन्वये, संबंधित सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये, संबंधित सर्व तहसील कार्यालये व संबंधित सर्व पंचायत समिती कार्यालयांना कळविण्यात आलेले असून, त्यांनी त्याबाबत व्यापक प्रसिद्धी दिलेली आहे तसेच स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्धी करण्यात आलेली आहे.

उपोद्घातातील अ.क्र. (५) मध्ये नमूद असलेनुसार, मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हील) क्रमांक ९८०/२०१९, ९८१/२०१९, १४०८/२०१९ आणि ७४३/२०२० मध्ये दिनांक ४ मार्च २०२१ रोजी दिलेल्या निकालानुसार नागरिकांच्या मागास प्रवर्गाकरिता जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२ (२) (क) नुसार देय असलेले २७ टक्के चे आरक्षण सर्वोच्च न्यायालयाच्या के. कृष्णमुर्ती व इतर वि. भारत सरकार मधील आदेशानुसार कमाल ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत ठेवून सदर जागांच्या फेर निवडणुका घेण्याचे मा. राज्य निवडणूक आयोगाला आदेश दिले आहेत.

उपोद्घातातील अ.क्र. (५) अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या निकालान्वये ज्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका न्यायालयाच्या निकालाच्या अधिन राहून जानेवारी, २०२० मध्ये घेण्यात आल्या होत्या, त्यामध्ये जेथे ५० टक्के पेक्षा जास्त आरक्षण झाले आहे, तेथील नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या सर्व जागा दिनांक ०४ मार्च २०२१ पासून रिक्त झाल्याचे मानण्यात येईल असे निर्देशित केले आहे. त्याअनुषंगाने, उपोद्घातातील क्र. (५) सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार वाशिम जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणा-या मंगरुळपीर, मालेगांव, रिसोड व वाशिम पंचायत समिती मधील नागरिकांची मागासवर्ग प्रवर्ग सदस्यांच्या सर्व जागा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०४ मार्च २०२१ रोजीच्या निकालापासून रिक्त झाल्या असल्याचे आदेश संबंधितांना बजाविण्यात यावे असे निर्देशित केले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजण एस., जिल्हाधिकारी, वाशिम, मला मा. राज्य निवडणूक आयोगाने उपोद्घातातील क्र. (४) अन्वये दिलेल्या निर्देशानुसार व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०४ मार्च २०२१ रोजीच्या निकालानुसार वाशिम जिल्हा परिषद व त्याअंतर्गत मंगरुळपीर, मालेगांव, रिसोड व वाशिम पंचायत समित्यांमधील या सोबतच्या परिशिष्ट अ व ब मध्ये नमूद केल्यानुसार नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या सदस्यांच्या सर्व जागा रिक्त झाल्याचे आदेशित करीत आहे.

## परिशिष्ट-अ

वाशिम जिल्हा परिषद निवडणूक २०१९-२०२० मध्ये नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्गामधून निवडून आलेल्या परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ९८०/२०१९, ९८१/२०१९, १४०८/२०१९ आणि ७४३/२०२० मधील दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये सदस्य पद रद्द करण्यात आलेल्या सदस्यांची नावे.

### जिल्हा परिषद, वाशिम

| अ. क्र. | तालुक्याचे नांव | निवडणूक विभाग/ गट क्रमांक व नांव | प्रवर्ग | सदस्याचे नाव | सदस्याचा संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | कारंजा | २-भामदेवी | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | प्रमोद पांडुरंग लळे | मु. धोत्रा देश, पो. भामदेवी, ता. कारंजा, जि. वाशिम. |
| २ | मानोरा | १०-कुपटा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ठाकरे उमेश वसंतराव | रा. जणुना खु, ता. मानोरा, जि. वाशिम. |
| ३ | मानोरा | ११-तळप | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | गावंडे शोभा सुरेश | रा. रामतिर्थ, ता. मानोरा, जि. वाशिम. |
| ४ | मानोरा | १५-फुलउमरी | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | चव्हाण सुरेखा अशोक | रा. भुली, ता. मानोरा, जि. वाशिम. |
| ५ | मंगरुळपीर | १९-दाभा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | मोहनावाले दिलीप शेरुभाई | मु. कोळंबी, पो. दाभा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ६ | मंगरुळपीर | २२-कंझरा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | कोठाळे सुनिता पांडुरंग | मु.पो. शेलु बाजार, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ७ | मंगरुळपीर | २४-आसेगांव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ठाकरे चंद्रकांत सुभाषराव | मु.पो. कासोळा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ८ | मालेगांव | २८-पांगरी नवघरे | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | उंडाळ रत्नमाला भाऊराव | रा. चिवरा, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ९ | रिसोड | ३७-कवठा खु. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | सरनाईक स्वप्नील संजयराव | रा. चिखली, ता. रिसोड, जि. वाशिम. |

**परिशिष्ट-अ**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १० | रिसोड | ३९-गोभणी | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | भुतेकर पुजा अमोल | रा. देगाव, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| ११ | रिसोड | ४१-भरजहागीर | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | गरकळ उषा माणिक | रा. भरजहागिर, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| १२ | वाशिम | ४३-काटा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | खानझोडे विजय ज्ञानबा | रा. कोंडाळा झामरे, ता. जि. वाशिम. |
| १३ | वाशिम | ४४-पार्डी टकमोर | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | चौधरी सरस्वती मोहन | रा. पार्डी टकमोर, ता. जि. वाशिम. |
| १४ | वाशिम | ५०-उकळीपेन | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | गोटे चरण दाजीबा | मु.पो. तोंडगांव, ता. जि. वाशिम. |

**परिशिष्ट-ब**

वाशिम जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समिती निवडणूक २०१९-२०२० मध्ये नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्गामधून निवडून आलेल्या परंतु मा. सर्वोच्च न्यायालयांच्या रिट याचिका क्र. ९८०/२०१९, ९८१/२०१९, १४०८/२०१९ आणि ७४३/२०२० मधील दिनांक ४ मार्च २०२१ रोजीच्या आदेशान्वये सदस्य पद रद्द करण्यात आलेल्या सदस्यांची नावे.

**पंचायत समिती**

| अ. क्र. | तालुका | निर्वाचक गण क्रमांक व नांव | प्रवर्ग | सदस्याचे नाव | सदस्याचा संपूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | मंगरुळपीर | ४०-पेडगांव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | इंगोले दिपाली बाळकृष्ण | मु. पेडगांव, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| २ | मंगरुळपीर | ४२-वनोजा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | चव्हाण गोविंदा फरीदा | मु. माळशेलु, पो. टिटवा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ३ | मंगरुळपीर | ४५-कासोळा | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | ठाकरे श्रीकांत साहेबराव | मु.पो. कासोळा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ४ | मंगरुळपीर | ४८-सनगांव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | महल्ले प्रतिभाताई देवराव | मु. दाभडी, पो. शेगी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| ५ | मालेगांव | ४९-मारसुळ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | घुगे अरुणराव शंकरराव | रा. मारसुळ, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ६ | मालेगांव | ५३-जऊळका | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | चव्हाण विवेक जेठमल | रा. जऊळका, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ७ | मालेगांव | ५४-जोडगव्हाण | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | जाधव निर्मला विष्णु | रा. रामनगर, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ८ | मालेगांव | ६४-शिरपूर-२ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | रेघीवाले मरियमबी सलीम | रा. शिरपूर, ता. मालेगांव, जि. वाशिम. |
| ९ | मालेगांव | ६६-खंडाळा शिंदे | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | व्यवहारे लक्ष्मीबाई गजानन | रा. ताकतोडा, ता. मालेगांव, जि. वाशिम. |

**परिशिष्ट-ब**—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| १० | रिसोड | ७३-कवठा खु. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | हरिमकर गीता संजय | मु.पो. कवठा खु., ता. रिसोड, जि. वाशिम. |
| ११ | रिसोड | ७५-हराळ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | खाडे विष्णु कुंडलीक | मु.पो. हराळ, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| १२ | रिसोड | ७९-वाकद | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | कुलाळ द्वारकाबाई अशोक | रा. एकलासपूर, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| १३ | रिसोड | ८०-महागाव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | बोडखे राहुल मनोहर | रा. घोडप बु., ता. रिसोड, जि. वाशिम. |
| १४ | रिसोड | ८२-मोप | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | नरवाडे मीना देवेंद्र | मु. मोप, ता. रिसोड, जि. वाशिम. |
| १५ | वाशिम | ९०-फाळेगांव थेट | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | वानखेडे सावित्रीबाई गोविंदराव | मु.पो. पार्डी आसरा, ता. जि. वाशिम. |
| १६ | वाशिम | ९२-कळंबा महाली | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | महाले सविता विनोद | मु.पो. कळंबा महाली, ता. जि. वाशिम. |
| १७ | वाशिम | १००-उकळीपेन | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | खोडके मंगला नारायण | मु.पो. उकळीपेन, ता. जि. वाशिम. |
| १८ | वाशिम | १०१-अनसिंग | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | माल प्रभाकर रामकृष्ण | मु.पो. अनसिंग, ता. जि. वाशिम. |
| १९ | वाशिम | १०२-पिंपळगांव | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्री | पांढरे ताई पांडुरंग | मु. खडसिंग, ता. जि. वाशिम. |

**शण्मुगराजण एस.,**
जिल्हाधिकारी,
वाशिम.

वाशिम :
दिनांक ६ मार्च २०२१.

अ.-एक-अ-३ (१७४८).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.